**"श्वेतकुष्ठ ( कोड )" ऐवजी "श्वेतत्वचा"**
असा उल्लेख करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१६३/आरोग्य-३अ
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक :- १५ मे, २०१३.

**प्रस्तावना :-**

त्वचेमध्ये असणाऱ्या मेलॅनीन (Melanin) या द्रव्यामुळे त्वचेस काळा रंग प्राप्त होतो. शरीराच्या ठराविक भागातील मेलॅनीन द्रव्य अचानकरित्या नाहीसे झाल्यामुळे तेथील त्वचेचा काळा रंग जाऊन तेथील त्वचा पांढरी दिसावयास लागते. या आजारास श्वेतकुष्ठ (कोड) असे संबोधण्यात येते. हा आजार संसर्गजन्य नाही तसेच यामुळे अपंगत्व अथवा मृत्यू येत नाही तसेच या आजारावर उपचार केले नाही तरीसुध्दा कोणतीही गुंतागूंत निर्माण होत नाही. वेळीच उपचार केल्यास या आजाराचा प्रसार थांबू शकतो. या आजारामुळे दैनंदिन जीवनावर कोणताही परिणाम होत नाही. तथापि, असे असले तरी या रोगाविषयीच्या व त्याच्या नावाच्या गैरसमजामुळे अशा रुग्णांना भेदभावपुर्ण वागणूक दिली जाते. समाजात भिती, अंधश्रध्दा निर्माण होते, तसेच मुलींना विवाह विषयक समस्यांना तोंड द्यावे लागते ही वस्तुस्थिती आहे. या बाबी लक्षात घेता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय :-**

त्वचेतील मेलॅनीन द्रव्य नाहीसे होण्यामुळे त्वचेचा काळा रंग बदलल्याने होणाऱ्या या आजारास **"श्वेतकुष्ठ (कोड)"** असे न म्हणता **"श्वेतत्वचा"** असे संबोधण्यात यावे. यासंदर्भात करण्यात येणाऱ्या जाहिराती, फलक,वैद्यकीय व्यावसायिकांकडून देण्यात येणारी प्रिस्क्रीप्शन्स, देण्यात येणारी औषधे, त्वचा विषयक वेगवेगळी क्रीम्स, मलम, गोळया, वैद्यकीय व इतर पुस्तके इ.ठिकाणी **"श्वेतकुष्ठ (कोड)"** हा शब्द वापरण्यावर बंदी घालण्यात येत असून **"श्वेतत्वचा"** हा शब्द वापरण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्रज्ञा महाले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री ( आरोग्य )/ मा.राज्य मंत्री (आरोग्य ) यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
आयुक्त,अन्न व औषध प्रशासन, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे, मुंबई ४०० ०५१.
संचालक,आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
सर्व सह संचालक/उप संचालक, आरोग्य सेवा
सर्व मंत्रालयीन विभाग
सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती- आरोग्य-३ अ, सा.आ.विभाग.